# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३३७ - २२ दिनांक १२/११/२०२२

## ऑक्टोबर महिन्यामध्ये गुन्हयाची उत्कृष्ट उकल करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०९/०९/२०२२ रोजी तक्रारदार श्रीमती ज्योती दत्ताराम सकपाळ, वय ६५ वर्ष या वसई स्टेशन परिसरात भाजी खरेदी करण्यासाठी गेल्या असता दोन अनोळखी इसमांनी त्यांना बोलण्यात गुंतवून कोणाचा काहीही भरोसा नाही असे बोलुन त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडील सोन्याच्या कुड्या, चैन व कानातील साखळ्या असे एकूण रु. ५५,०००/- किंमतीचे दागिने काढुन देण्यास भाग पाडुन हातचलाखी करुन फिर्यादी यांना मुळ दागिन्यांच्या बदल्यात रुमालातुन मातीचे खडे देवुन त्यांची फसवणूक केल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. ३१९/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी हे पालघर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई परिसरात अशा प्रकारचे गुन्हे वारंवार कररित असल्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन माणिकपुर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास आरोपींचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक माहितीच्या अनुषंगाने आरोपींना निष्पन्न करुन दिनांक १९/१०/२०२२ रोजी अर्जुन सलाट ऊर्फ मारवाडी यास नेवालीगाव, हाजीमलंग, कल्याण येथुन सापळा रचुन अटक केली आहे.

आरोपी व त्याचे सहकाऱ्यांनी पालघर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई परिसरात अशाच प्रकारचे गुन्हे करुन वृध्द महिलांची फसवणुक केल्याची माहिती दिली असुन त्याचेकडुन अंदाजे ७९.५ ग्रॅम वजनाचे अंदाजे किंमत रुपये. २,७८,१२३/- रकमेचे दागिने जप्त करण्यात आले आहे.

अटक आरोपी याचेकडुन खालील गुन्हे उघड करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | तुळीज पोलीस ठाणे | गु.र.क्र. ५५७/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. ३१९/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ३. | वसई रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.क्र. ७६५/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ४. | कल्याण रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.क्र. १४२१/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ५. | वाशी रेल्वे पोलीस ठाणे | गु.र.क्र. २७१/२०२२ कलम ३२८,३७९,३४ भा.दं.वि. |

सदरची कामगिरी करणाऱ्या माणिकपूर पोलीस स्टेशनच्या श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण, धनंजय चौधरी, पो.शि. प्रविण कांदे यांचा दिनांक १२/११/२०२२ रोजी श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' विशेष** प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री संपतराव पाटील**

---ooo---